क्रमांक : १४३४ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
मुंबई, दिनांक : २७ जानेवारी, २०२२

**: : प रि प त्र क : :**

या सचिवालयातील **"सहायक मालमत्ता व्यवस्थापक" (Assistant Estate Manager)** (वेतनश्रेणी :- एस-१४-३८६००-१२२८००) गट-ब (अराजपत्रित) या सवंर्गात २ पदे अस्तित्वात असून दोन्ही पदे सद्य:स्थितीत रिक्त आहे. उक्त पदांच्या (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम-२०१४ अन्वये या पदावरील नियुक्ती खालीलपैकी कोणत्याही पध्दतीने करता येईल अशी तरतूद आहे :-

(अ) विधानमंडळ सचिवालयातील किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या सहायक कक्ष अधिकाऱ्यांमधून पात्र ठरविलेल्या व्यक्तीच्या नियुक्तीद्वारे,

**किंवा**

(ब) विधानमंडळ सचिवालयातील किमान पाच वर्षाहून कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या लिपिक-टंकलेखक संवर्गातील पात्र ठरविलेल्या व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे.

"सहायक मालमत्ता व्यवस्थापक" पदावर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास "सहायक मालमत्ता व्यवस्थापक" पदावर कमीत कमी ३ वर्षे काम पहावे लागेल व तसा अंगिकारनामा कार्यालयाकडे द्यावा लागेल. परंतु, सहायक मालमत्ता व्यवस्थापक पदावर नियुक्त होणारा कर्मचारी या सचिवालयातील अन्य संवर्गात पदोन्नतीकरीता पात्र असल्यास त्यास त्या पदावर पदोन्नती स्विकारता येईल.

नियमातील वरील तरतूदीच्या अधीन राहून सहायक मालमत्ता व्यवस्थापक (खुला-१ पद व अ.जा.-१ पद) ही पदे भरावयाचे असल्याने या सचिवालयातील सहायक कक्ष अधिकारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातील (लिपिक-टंकलेखक, देयक लिपिक, गोपनीय लिपिक, मुख्य टंकलेखक व रोखपाल) (खुला व राखीव – (अनु.जाती) या प्रवर्गातील) कर्मचाऱ्यांनी सोबत दिलेल्या नमूना आवेदन पत्रानुसार त्यांचे अर्ज सादर करावयाचे आहेत. इच्छूक कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत कार्यालयास सादर करावेत. विहीत कालावधीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

**प्रति,**

१) सर्व सहायक कक्ष अधिकारी

२) सर्व लिपिक-टंकलेखक संवर्ग

**प्रतिलिपी :-**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

२) विशेष कार्य अधिकारी (श्री.महाजन), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

३) उप सचिव (श्री.तारवी), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

४) अवर सचिव (श्री.जगदाळे), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

५) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

# :: आवेदन पत्राचा नमूना ::

**प्रति,**

मा.प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.

विषय : **"सहायक मालमत्ता व्यवस्थापक" पदासाठी आवेदन पत्र.**

**महोदय,**

"सहायक मालमत्ता व्यवस्थापक" पदासाठी मी आवेदन पत्र सादर करीत असून माझी वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे आहे.

**१) नाव व पदनाम :**

**२) प्रवर्ग :**

**३) या सचिवालयातील प्रथम नियुक्तीचे पद व दिनांक :**

**४) धारण केलेली पदे व कालावधी :**

**५) सहायक कक्ष अधिकारी / लिपिक-टंकलेखक पदावर नियमित नियुक्ती झाल्याचा दिनांक व कालावधी :**

**६) शैक्षणिक अर्हता :**

**७) जन्म तारीख व वय :**

**८) निवासस्थानाचा पत्ता :**

**९) जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर केल्याचा दिनांक :**

**आपला/आपली,**

( )

\\mls-dataserver\C Branch\१४०१\C-१०१\Local Disk (d)\E Drive\२०२२\promotion\STEWARD\Proforma.doc